# Regional Marathi Text Bulletin, Chatrapati Sambhajinagar
# Date – 03 April 2024
# Time 7.10 AM to 7.20 AM
# Language Marathi
# आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर
# प्रादेशिक बातम्या
# दिनांक ०३ एप्रिल २०२४ सकाळी ७.१० मि.

****

- लोकसभा निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्यासाठी अर्ज भरण्याच्या प्रक्रियेला वेग, परभणीतून विद्यमान खासदार संजय जाधव तर नांदेडमधून प्रतापराव पाटील चिखलीकर यांचे अर्ज दाखल
- वंचित बहुजन आघाडीची औरंगाबादमधून अफसर खान, परभणी – बाबासाहेब उगले तर नांदेडमधून अविनाश भोसीकर यांना उमेदवारी
- नांदेड तसंच लातूर इथं मतदार जनजागृतीसाठी विविध कार्यक्रम

आणि

- पैठण इथं नाथषष्ठी सोहळ्याची काल्याची दहीहंडी फोडून सांगता

****

लोकसभा निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्यासाठी अर्ज भरण्याच्या प्रक्रियेला वेग आला आहे. परभणी लोकसभा मतदारसंघात शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे विद्यमान खासदार संजय जाधव यांनी महाविकास आघाडीकडून काल अर्ज दाखल केला. विरोधी पक्षनेते अंबादास दानवे, राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते राजेश टोपे यावेळी उपस्थित होते. शनिवार बाजार ते जिल्हाधिकारी कार्यालय अशी रॅली काढत शक्ती प्रदर्शन करुन जाधव यांनी सभेला संबोधित केलं. इतर चार उमेदवारांनी देखील काल अर्ज दाखल केले. या मतदरासंघात आतापर्यंत नऊ उमेदवारांचे १८ अर्ज स्वीकारण्यात आले आहेत.

नांदेड लोकसभा मतदारसंघात भाजपचे विद्यमान खासदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी काल उमेदवारी अर्ज दाखल केला. राष्ट्रीय किसान पक्षाचे विष्णू जाधव यांच्यासह जगदीश पोतरे, सुरज कदम, नागोराव वाघमारे आणि नय्यर जहाँ

मोहम्मद फेरोज हुसेन या अपक्ष उमेदवारांनी देखील अर्ज भरले. नांदेड लोकसभा मतदारसंघात आतापर्यंत ११ अर्ज दाखल झाले आहेत.

हिंगोली लोकसभा मतदार संघात काल पाच उमेदवारांनी आठ उमेदवारी अर्ज दाखल केले. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे उमेदवार नागेश आष्टीकर यांनी काल महाविकास आघाडीकडून उमेदवारी अर्ज भरला. त्याशिवाय ओबीसी बहुजन पार्टीचे रवि शिंदे यांच्यासह नामदेव कल्याणकर, देशा बंजारा आणि वसंत पाईकराव यांनी अपक्ष म्हणून अर्ज दाखल केले.

वर्धा लोकसभा मतदारसंघातून राष्ट्रवादी काँग्रेसच्या शरद पवार गटाचे अमर काळे यांनी महाविकास आघाडीकडून काल उमेदवारी अर्ज दाखल केला. पक्षाचे प्रमुख, खासदार शरद पवार यावेळी उपस्थित होते.

बुलढाणा लोकसभा मतदारसंघातून शिवसेनेचे प्रतापराव जाधव यांनी महायुतीकडून काल उमेदवारी अर्ज भरला. राज्याचे पाणीपुरवठा मंत्री गुलाबराव पाटील यावेळी उपस्थित होते.

यवतमाळ –वाशिम लोकसभा मतदारसंघात महाविकास आघाडीचे उमेदवार संजय देशमुख यांनी देखील काल उमेदवारी अर्ज दाखल केला. आमदार आदित्य ठाकरे आणि रोहीत पवार यावेळी उपस्थित होते. या मतदारसंघात आतापर्यंत एकूण पाच अर्ज दाखल झाले आहेत.

****

काँग्रेस पक्षाने काल सतरा उमेदवारांची यादी जाहीर केली. यामध्ये ओडिशामधल्या आठ, आंध्र प्रदेश पाच, बिहार तीन, तर पश्चिम बंगालमधल्या एका उमेदवाराचा समावेश आहे.

****

लोकसभा निवडणूकीसाठी वंचित बहुजन आघाडीनं काल पाच उमेदवारांची यादी जाहीर केली. औरंगाबाद मतदार संघातून अफसर खान यांना उमेदवारी जाहीर करण्यात आली आहे. परभणी इथून बाबासाहेब उगले, नांदेड – अविनाश भोसीकर, पुण्यातून वसंत मोरे यांना तर शिरूर इथून मंगलदास बांदल यांना उमेदवारी जाहीर करण्यात आली आहे. बारामती मध्ये सुप्रिया सुळे यांना पाठिंबा देणार असल्याचं वंचित बहुजन आघाडीनं जाहीर केलं आहे.

****

लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर निवडणूक आयोगाद्वारे महाराष्ट्रासह पश्चिम बंगाल, उत्तर प्रदेश, ओडिशा, आंध्र प्रदेश आणि बिहार या राज्यांमध्ये विशेष निरीक्षकांची नियुक्ती करण्यात आली आहे. कर्मचारी, सुरक्षा दल आणि मतदान यंत्रांचं पर्यवेक्षण करण्याचं महत्त्वपूर्ण काम विशेष निरीक्षकांवर सोपवण्यात आलं आहे. विशेष निरीक्षक राज्याच्या मुख्यालयात थांबून तसंच स्थानिक अधिकाऱ्यांशी समन्वय साधून संवेदनशील भागाचा दौरा करतील, असं आयोगानं जारी केलेल्या प्रसिद्धीपत्रकात म्हटलं आहे.

****

औरंगाबाद लोकसभा मतदार संघाची मतमोजणी केंद्रं आणि त्याठिकाणी निर्माण करावयाच्या सुविधांचा जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी दिलीप स्वामी यांनी काल आढावा घेतला. उन्हाळ्याचे दिवस असल्याने आवश्यक त्या उपाययोजना कराव्या, सुरक्षा यंत्रणा, संदेशवहन यंत्रणा, इंटरनेट आदींची उपलब्धता करावी, असे निर्देश जिल्हाधिकारी स्वामी यांनी यावेळी दिले.

****

नवमतदारांनी मतदान करुन आपलं कर्तव्य पूर्ण करावं, असं आवाहन नांदेड जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी तथा मतदान जनजागृती कक्षाच्या प्रमुख मिनल करनवाल यांनी केलं आहे. नांदेड शहरातल्या नेताजी सुभाषचंद्र बोस महाविद्यालयात तीनशे नवमतदारांसोबत संवाद साधताना त्या काल बोलत होत्या. मतदान आवश्यकता आणि गरज या विषयावर विविध उदाहरणं देऊन त्यांनी विद्यार्थ्यांना मतदानाचं महत्त्व पटवून दिलं.

दरम्यान, नांदेड जिल्ह्यात आज स्वयं सहाय्यता गटातल्या सुमारे एक लाख ८५ हजार महिला मतदान करण्याची शपथ घेणार आहेत. या मोहिमेत महिला आणि युवतींनी मोठ्या प्रमाणात सहभाग घ्यावा, असं आवाहन करनवाल यांनी केलं आहे.

****

जागतिक ऑटीझम दिनानिमित्त लातूर जिल्ह्यात दिव्यांग विद्यार्थ्यांची प्रभातफेरी काढून मतदानाविषयी काल जनजागृती करण्यात आली. जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर –घुगे यांच्या उपस्थितीत ३५० विद्यार्थ्यांनी पथनाट्य सादर करत नागरीकांना मतदानाचं आवाहन केलं. जिल्हा परिषदेच्या इमारतीत उभारण्यात आलेल्या मतदार जनजागृती संकल्पनेचं उद्घाटन जिल्हाधिकार्यांच्या हस्ते यावेळी करण्यात आलं.

यावेळी जिल्हाधिकार्यांनी लातूर शहरातल्या छत्रपती शिवाजी महाराज चौक इथं असंघटीत कामगारांशी संवाद साधून त्यांना मतदान करण्याचं आवाहन केलं.

****

राज्यात लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची येत्या दहा तारखेला रामटेक इथं जाहीर सभा होणार आहे. १४ एप्रिलला नागपूर मध्ये दीक्षाभूमी इथं दर्शन घेऊन, पंतप्रधान मोदी चंद्रपूर इथं सभा घेणार आहेत. भाजप नेते प्रवीण दरेकर यांनी काल मुंबईत पत्रकार परिषदेत ही माहिती दिली.

****

चंद्रपूर लोकसभा मतदरासंघातले भाजप महायुतीचे उमेदवार सुधीर मुनगंटीवार यांनी काल प्रचारादरम्यान वार्ताहरांशी संवाद साधला. जनतेच्या हितासाठी ही लढाई असून, आपल्याला नागरीकांचा आशिर्वाद मिळेल, असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला.

****

महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे फेब्रुवारी महिन्यात घेण्यात आलेल्या महाराष्ट्र स्थापत्य अभियांत्रिकी सेवा मुख्य परीक्षा- २०२२ चा अंतिम निकाल जाहीर करण्यात आला आहे. त्यानुसार १०१ उमेदवारांची शासनाकडे शिफारस करण्यात आली आहे. परीक्षेमध्ये नाशिक जिल्ह्यातले ओंकार संजय निकुंभ हे खुला आणि मागास वर्गवारीतून, तर छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातल्या स्वप्नाली तांदुळजे या महिला वर्गवारीतून राज्यात प्रथम आल्या आहेत.

****

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात पैठण इथं संत एकनाथ महाराज यांच्या २४५ व्या नाथषष्ठी सोहळ्याची काल काल्याची दहीहंडी फोडून सांगता झाली. यावेळी वारकरी भाविकांनी मोठी गर्दी केली होती. तसंच छत्रपती संभाजीनगर शहरातल्या औरंगपुरा इथल्या संत एकनाथ महाराज यांच्या मंदीरातही काल काल्याची दहीहंडी फोडण्यात आली.

****

छत्रपती संभाजीनगरसाठी राबवण्यात येणाऱ्या पाणी पुरवठा योजनेसाठी सर्वांनी सहकार्य करावं, अशी अपेक्षा मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने व्यक्त केली आहे. शहराच्या दोन हजार ७४० कोटी रुपयांच्या पाणी पुरवठा योजनेचा पाठपुरावा घेण्यासाठी दाखल जनहीत याचिकेवर काल झालेल्या

सुनावणीत खंडपीठाने जलकुंभांबाबत माहिती घेतली. हनुमान टेकडी आणि टीव्ही सेंटरचे जलकुंभ हस्तांतरित करण्यात आले असून, इतर चार जलकुंभांचं हस्तांतरण एप्रिल अखेरपर्यंत करण्यात येईल, असं संबंधित कंपनीने यावेळी सांगितलं. यासंदर्भात पुढची सुनावणी १६ एप्रिलला होणार आहे.

****

नांदेड जिल्ह्यात वेगवेगळ्या तालुक्यात एकाच दिवशी घडणा-या बालविवाहांना महिला आणि बाल विकास विभाग, जिल्हा आणि पोलीस प्रशासन यांच्या सहकार्यानं रोखण्यात यश आलं. महिला आणि बाल विकास विभागाच्या कर्मचा-यांना घटनास्थळी पाठवून हे बालविवाह समुपदेशनाच्या माध्यमातून थांबवण्यात आले. जिल्ह्यात बाल विवाह रोखण्यासाठी ग्राम बालसंरक्षण समितीने आपली भूमिका कर्तव्यदक्षपणे पार पाडावी, असं आवाहन जिल्हाधिकारी अभिजित राऊत यांनी केलं आहे.

****

जालना जिल्ह्यात लाचलूचपत प्रतिबंधक विभागानं काल महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळातल्या तीन जणांना दीड हजार रूपयांची लाच स्विकारताना रंगेहाथ पकडलं. जिल्हा व्यवस्थापक सुनिल काची, कार्यालय सहाय्यक छाया वाकोडे, संगणक ऑपरेटर आशिष जाधव यांनी तक्रारदाराच्या मसाला उद्योग सुरू करण्यासाठी मागणी केलेले कर्ज प्रकरण मंजुरीला पाठवण्यासाठी ही लाच मागितली होती.

****

लोकसभा निवडणुकीच्या काळात काँग्रेसची खाती गोठवण्यात येत असल्याच्या निषेधार्थ धाराशिव इथं काल जिल्हा काँग्रेसच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर निदर्शनं करण्यात आली. या आंदोलनानंतर जिल्हाधकाऱ्यांमार्फत राष्ट्रपती द्रोपदी मुर्मू यांना निवेदन देण्यात आलं.

****

राज्य उत्पादन शुल्क विभागानं काल मुंबईत वरळी आणि अंधेरी इथं अवैध मद्याचा साठा आणि चारचाकी वाहनासह ३७ लाख रूपये किंमतीचा मुद्देमाल जप्त केला. याप्रकरणी सतीश शिवलाल पटेल या आरोपीला अटक करून त्याच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

****

हवामान

राज्यात उष्णतेचा तडाखा कायम आहे. काल मालेगाव आणि जेऊर इथं सर्वाधिक ४२ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली. मराठवाड्यात जालना आणि बीड इथं ४० अंश, लातूर ३९ तर छत्रपती संभाजीनगर इथं ३८ पूर्णांक चार अंश सेल्सिअस तापमान नोंदवलं गेलं.

****